कोरोना २०२०/सूचना/आदेश क्र - ७१

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग
हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: tahasildargadraigad@gmail.com

(सामान्य शाखा) क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना विषाणू/प्रति.उपाय./२०२० दि. २०/०३/२०२०

वाचले:- १) साथरोग अधिनियम १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम २५, ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१

३) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०

४) शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०

---

आदेश :-

ज्याअर्थी, शासन,सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.३ कडील अधिसूचनेद्वारे साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २, ३ व ४ ची अंमलबजावणी राज्यात सदर अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून सुरु करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र. ३ कडील अधिसूचनेद्वारे करोना विषाणूचा प्रसार रोखण्याकामी **"महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२०"** प्रसिध्द केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष घोषीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू आजाराची लक्षणे ही मुख्यत्वे श्वसन संस्थेशी निगडीत आहेत व ताप, खोकला, श्वास घ्यायला त्रास होणे, निमोनिया, काही वेळा मूत्रपिंड निकामी होणे अशी लक्षणे मुख्यत्वेकरुन असून सर्वसाधारणपणे हा आजार हवे वाटे शिंकण्या खोकल्यातून जे थेंब बाहेर पडतात त्याद्वारे पसरतो. त्यामुळे शासनाने सदर विषाणूंच्या प्रसारावर आळा घालण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाय जारी केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू प्रसार रोखण्यासाठी नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी रोखणे आवश्यक आहे. कारण गर्दीमुळे करोना विषाणूचा संक्रमण/प्रसार अधिक होण्याचा धोका संभवत आहे. त्यामुळे अशाप्रकारे संभावित गर्दीच्या ठिकाणावर बंदी घालणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी रायगड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड मला उपोद्घातातील अ.क्र.४ कडील नमूद अधिसूचनेद्वारे प्रसिध्द महाराष्ट्र

कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम १० नुसार प्राप्त अधिकारातून करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रायगड जिल्हयातील तहसिल कार्यालयातील सेतू केंद्रे तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत घेतली जाणारी ड्रायव्हिंग टेस्ट तसेच दिले जाणारे वाहन परवाने वितरणाच्या व अनुषंगिक सेवा दि.३१/ ०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देत आहे.

सदर आदेशाचा तात्काळ अंमल देण्यात यावा.

सही/-XXX
**(निधी चौधरी)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

प्रत :- मा.प्रधान सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांजकडे माहितीसाठी
प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर
प्रत :- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांजकडे माहितीसाठी
प्रत :- पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, राजिप, अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/- सदर आदेशाच्या अंमलबाजवणीसंदर्भात उचित कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

प्रत :- उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/- सदर आदेशाच्या अंमलबाजवणीसंदर्भात उचित कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Collector Raigad-Alibag

**(निधी चौधरी)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**